Vol 4 Issue 5 Feb 2015

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

*Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 5 | Feb. 2015
Available online at www.ror.isrj.org

# जागतिक सहकारी चळवळ: एक अभ्यास

जगन्नाथ मोतीराम साळवे

अर्थशास्त्र विभागप्रमुख, मु.सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर ता-बारामती जि-पुणे.

***सारांश*** :- सहकारी चळवळ ही फक्त सामाजिक दृष्टयाच महत्वाची नसून राजकीय दृष्टया व आर्थिक दृष्टया देखील महत्वपुर्ण आहे. सहकाराने देशाच्या ग्रामीण जीवनाला एक आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच काही क्षेत्र तर असे आहे की जिथे सहकाराचीच मक्तेदारी आहे. उदा. साखर उद्योग, सहकाराच्या माध्यमातून समाजाची रचना एक शिस्तबध्द चौकटीत करणे शक्य आहे. त्यामुळे देशाच्या अर्थकारणात, राजकारणात व समाजकारणात सहकाराची भुमिका ही महत्वपुर्ण आहे. आजच्या समाज व्यवस्थेमध्ये सहकाराचे महत्व अनन्यसाधारण आहे.

## *प्रस्तावना*

दुर्बलांचे शोषण, संपत्तीचे विषम वाटप, वर्गसंघर्ष,राजकीय लढे यांचा लोप सहकारामुळे होत असल्याने बंधुता व समानता यावर आधारलेला नवा समाज निर्माण करण्यासाठी सहकारासारखे दुसरे साधन नाही. सहकार चळवळीचा अभ्यास करत असताना सहकार चळवळीची उत्काती तसेच सहकार चळवळीचे फायदे तोटे विचारात घेतले आहेत. सहकार चळवळ किती महत्वाची आहे, किती फायदयाची आहे हे खालील विश्लेशणावरून समजून येते.

## सहकार चळवळीची उत्कती :

जागतिक पातळीवर सहकारी चळवळीची उत्कांती १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इग्लंडमध्ये झाली. या काळत इंग्लडमध्ये वाफेच्या व विजेच्या शोधामुळे औद्योगिक कांती घडून आली. घरगुती स्वरूपात होणा-या उत्पादनाची जागा गिरणी यंत्राने घेतली. यामुळे ग्रामीण भागातील अनेक बेरोजगारांना शहरातील कारखान्यांमध्ये रोजगार मिळण्यास सुरवात झाली. मालक वर्ग व कामगार वर्ग निर्माण झाले. या सर्व बदलांमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.

कामगारांना कमी वेतन, वाढत जाणारी बेकारी, बालकामगारांचे शोषण, तसेच कारखान्यात काम करणा-या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न, अशा विविध समस्यांनी कामगार वर्ग ग्रासलेला होता. यासाठी एखादी कामगार संघटना असावी. त्यांनी कामगारांचे प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारचा विचार समाजातून निर्माण होऊ लागला. तसेच या काळात लोकांना बोलण्यासाठी, लिहण्यासाठी तसेच एकत्रित होण्यासाठी संघटना स्थापन करण्याचे स्वातंज्य मिळावे. याची मागणी समाजातून होत होती. यामुळे सहकारासारख्या लोकप्रिय चळवळीला गती मिळाली.

इंग्लंडमध्ये औद्योगिक कांतीच्या परिणामाचा विचार करण्यासाठी अनेक राजकीय विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक पुढे आले. ज्यांना मालक मजूर यांच्यातील संबंधाचा विचार करून उदार धोरण स्वीकारावे असे वाटत होते. त्यामध्ये सहकार चळवळीचा पिता रॉबर्ट ओवेन यांचा समावेश होतो. रॉबर्ट ओवेन हे उदारमतवादी, माणुसकी असलेले दयाळू व्यक्तीमत्व. उद्योगपती होण्याअगोदर ते एक कामगार होते. त्यामुळे त्यांना कामगारांच्या अडचणी कोणत्या? दु:ख कोणती? हे माहीत होते. तेव्हा त्यांनी आपले विचार कामगार वर्गासमोर मांडले. कामगार संघटना स्थापन करून त्यातून मार्ग काढण्याचे सुचविले. परंतु त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. तसेच त्यावेळी काही श्रमिकांनी एकत्र येऊन अनौपचारिक सहकारी कार्य वाहीतून आपले दैनंदिन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता.

रॉबर्ट ओवेन यांचा संपत्ती संचयावर विश्वास नव्हता. पैसा व संपत्तीतून अनेक समस्या निर्माण होतात. उदा. अन्याय, पिळवणूक, संघर्ष हे दोष समाजात दिसू लागतात. हे टाळण्यासाठी समाजवादाचा स्वीकार करून उत्पादन, विभाजन, वितरण, उपभोग इत्यादी क्षेत्रात सहकारी तत्वांवर आधारलेली संस्था स्थापन करण्याच्या उद्देशाने त्यांनी राष्ट्रीय श्रम विनिमय केंद्र स्थापन केले. परंतु त्यांचा हा प्रयोग पुढे फसला. समता, सामाजिक मालकी, परस्परात सहाय्य, न्यायमुल्य, नफ्याचे उच्चाटन, वर्तणुकीत सुधारणा आणण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. यामधूनच ओवेनने सहकार चळवळीचा पाया घातला.

रॉबर्ट ओवेन व डॉ . किंग यांनी सहकाराच्या तत्वांचा प्रसार केला . या दोघांच्या विचारामध्ये मतभिन्न्ता होती . पण सामाजिक आणि आर्थिक सुधारणांसाठी दोघांची धडपड होती . सन १९४३ मध्ये ओवेनच्या विचारसरणीचे २८ विणकर एकत्र आले . त्यापैकी एकाने सुचविले की, कामगारांच्या वेतनात वाढ घडवून आणणे आवघड आहे . परंतु सामुदायिकपणे खर्च करून खर्च निश्चितपणे कमी करता येईल, या विचारसरणीनुसार सहकारी तत्वावर ग्राहक भांडार सरू केले . परंतु सभासदांची उधारी वाढू लागली, भांडाराचा खर्च वाढू लागला, त्यामुळे सभासदांची भांडवलावरील निष्ठा कमी झाली . परिणामी भांडार बंद करावे लागले . या अनुभवाचा विचार करून या २८ सभासदांनी वर्षाला एक पौंड बचत करून २८ पौंड जमा केले व २४ ऑक्टोंबर १९४४ रोजी रॉश्डेल इक्विटेबल पायोनियर सोसायटीची नव्याने नोंदणी केली . या संस्थेचा प्रत्यक्ष कारभार २१ डिसेंबर १८४४ मध्ये सुरू झाला . या संस्थेने एक दुकान भाडयाने घेऊन विक्री करण्याचे काम सुरू केले . पुढे संस्थेची प्रगती झाली . सभासद संख्या वाढत गेली व आदर्श स्थिती निर्माण झाली . रॉश्डेल संस्थेबरोबर सहकारी तत्वावर चालणा-या अनेक संस्था त्या काळात स्थापन झाल्या . परंतु ओवेन यांच्या रॉश्डेल प्रणेत्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले . म्हणूनच रॉबर्ट ओवेन या सहकारी प्रणेत्याने केवळ चळवळ चालवली नाही तर इंग्लडमध्ये सहकारी चळवळ जोमाने वाढवली . यामधून इंग्लंडमध्ये किरकोळ ग्राहक भांडारे, सहकारी घाऊक संस्था याबरोबर शेती सहकारी चळवळ, सहकारी गृहनिर्माण परिषद इ . विविध संस्था निर्माण झाल्या व त्यांचा विकास होत गेला अशा प्रकारे सर्व प्रथम इंग्लंडमध्ये सहकार चळवळ सुरू झाली .

इंग्लंडमध्ये सुरू झालेल्या सहकारी चळवळीचा आदर्श घेऊन जगामध्ये इतर देशातदेखील सहकारी चळवळी सुरू झाल्या . यामध्ये डेन्मार्क शेती सहकार चळवळ, सहकारी डेअरी, सहकारी अंडी निर्माण स्स्था, ग्राहक संस्था, पतसंस्था निर्माण झाल्या .

रशियाने देखील सहकारी क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे . १९ व्या शतकात सहकारी ग्राहक भांडारे, सामुदायिक शेती पध्दती इत्यदी सहकाराचे प्रयोग केले व सहकारी चळवळ उभारली .

चीनमध्ये इ . स १९१८ नंतर सहकाराला सूरूवात झाली . चीनमध्ये औद्योगीक सहकारी संस्था, शेती सहकारी संस्था इत्यादी विकसित झाल्या . सहकारी तत्वाचा वापर करणारे जर्मनी हे जगातले पहिले राष्ट्र आहे . १९ व्या शतकाच्या मध्यास जर्मनीत पतसहकारी चळवळ सुरू झाली . जर्मनीत सुरू झालेल्या सहकारी चळवळीमुळेच भारतीय सहकार चळवळीस प्रेरणा मिळाली . युरोपातील शेती बॅकांच्या कार्याचा अभ्यास करण्यासाठी भारतात सहकार चळवळ सुरू करण्याबाबत शिफारस करण्यासाठी  निकोलसन यांना युरोपात पाठवण्यात आले .

सहकारी चळवळीचा जगतीक पातळीवरचा अभ्यास करत असतानाच या सहकारी चळवळीच्या फायदयांचा आणि तोटयांचा अभ्यास करणे उचीत ठरते . सहकारी चळवळीचे खालील प्रमाणे फायदे आणि तोटे दिसून येतात .

**सहकार चळवळीचे फायदे :** सहकारी चळवळीचे फायदे खालील प्रमाणे दिसून येतात .

**अ) आर्थिक फायदे :-** सहकार चळवळीमुळे  झालेले आर्थिक फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतात .

**१)अल्प दराने कर्ज :-** या पुर्वी शेतक-यांना सावकारांकडून चढत्या दराने कर्ज घ्यावे लागत असे . परंतू सहकार क्षेत्राच्या स्थापनेपासून ग्रामीण भागात कमी दराने कर्ज पुरवठा करण्याचे महत्वाचे कार्य सहकारी संस्थांनी पार पाडले आहे . पर्यायाने सावकारांना देखील स्व :ताचा व्याजाचा दर थोडया प्रमाणात का होईना  कमी करावा लागला आहे

**२)सावकारी पाशातून काही प्रमाणात मुक्तता :-** भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो,कर्जात वाढतो व कर्जात मरतो ही वस्तुस्थिती सहकारी संस्थांमुळे बदलली आहे . आज जवळपास शेतक-यांची ५० टक्के कर्जाची गरज सहकारी संस्थाच भागवित असल्याचे दिसून येते . आता सावकाराच्या दयेवर जगण्याची गरज शेतक-यांना राहीली नाही .

**३)शेतात आधुनिक तंत्रचा वापर :-**सहकार क्षेत्रातील विविध संस्थामुळे शेतक-यांना शेतीतील अधुनिक तंत्राची माहिती होऊ शकली यामुळे शेतमालच्या उत्पादनात देखील भर पडली . खतांचा वापर,बि-बियाणे,किटकनाशक औषधे इत्यादीसाठी असलेल्या सहकारी संस्थाचा फायदा शेतकरी वर्गास हमखास झाला आहे .

**४)शेतमालास योग्य किंमत :-** मध्यस्थ व सावकारांमुळे शेतक-यास त्यांच्या मालास योग्य किंमत मिळत नव्हती . हे लोक कमी किंमतीला माल घेत असत . विपणन सहकारी समित्यांमुळे व नियमित बाजरपेठांच्या स्थापनेमुळे शेतक-यांना शेतमालास योग्य किंमत मिळू लागली आहे . यामुळे त्यांच्या उत्पन्नात भर पडली आहे .

**५) नव्या उपक्रमांना प्रोत्साहन :-** प्रकिया समितीद्वारे ग्रामीण भागात ताग,साखर,भुईमूग इत्यादीवर प्रकिया करणारे करखाने स्थापन केले गेले . यामुळे एकीकडे ग्रामीण भागात रोजगार तर वाढलाच परंतु ग्रामीण जनतेचे उत्पन्नदेखील वाढले . याचा फायदा ग्रामीण तंत्रज्ञान, शेती व इतर लघु उद्योगांचा विकास होण्यास झाला .

**६) बचतीस प्रोत्साहन :-** वाढत्या उत्पन्नाबरोबर बचतीचे प्रमाणदेखील वाढावयास हवे असते . यादृष्टीने सहकारी संस्था वेळोवेळी योजना स्वत :च्या सभासदांकरिता अंमलात आणत असतात . या योजनांमध्ये सक्तीच्या बचत योजनेचा देखील सामावेश असतो . ही बचत अर्थातच सभासदांच्या हिताकरिता वापरली जाते .

**ब)सामाजिक व नैतिक फायदे :-**सहकार चळवळीचे सामाजिक व नैतिक फायदे पुढीलप्रमाणे आहेत .

१) सहाकार चळवळीमुळे एकता,बंधुता, सामाजिक जीवन जगण्याची पध्दती लोकांना प्रत्यक्षात अंमलात आणता आली .

२) कोर्टातील खटले, अनावश्यक खर्च, अनितीने पैसे कमावणे इत्यादी वाईट गोष्टी सहकार चळवळीमुळेच कमी होऊ शकल्या . स्वावलंबन व परस्पर सहकार्य या तत्वांचा वापर व्यवहारात केला जाऊ लागला .

३) स्वत:चे कार्य जबाबदारीने, प्रमाणिकपणे, मेहनतीने पार पाडण्याची भावना सभासदांमध्ये रूजली .
४) समाजातील विविध घटक जातपात, लिंगभेद, प्रांतभेद विसरून एकत्र येतात व कार्य करतात आणि राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करतात .

**क)शैक्षणिक फायदे :-**

१) स्वत:च्या सभासदांना व्यापार पध्दतीत हिशोबांची सर्वांगिण माहिती सहकारी संस्था देतात . ही सवलत खासगी क्षेत्रात नसते .
२) नफ्याचे प्रमाण एकदा वाढीस लागले की,सभासद अधिक सुशिक्षित होऊ इच्छितात व नफ्याचे प्रमाण अधिक वाढविण्याच्या प्रयत्नास लागतात .
३) सहकारी संस्था कार्यकर्त्यांना प्रशिक्षीत करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे चालवितात .
ड) राजकीय फायदे :-सहकार चळवळीचे पुढीलप्रमाणे राजकीय फायदे सांगता येतील .
१) सहकारी संस्थामधून स्थानिक नेतृत्व तयार केले जाते . बाहेरील व्यक्तीवर विसंबून राहण्याचे प्रमाण कमी केले जाते .
२) त्यागी व प्रामाणिक सामाजिक कार्यकर्ते तयार केल्याने पर्यायाने देशातील राजकीय वातावरणदेखील निरोगी ठेवण्यास मदत होते .
३) सहकारी संस्थांचे व्यवस्थापन लोकशाही तत्वांनुसार चालते . लोकशाही तत्वांचा श्रीगणेशा येथे शिकविला जातो .

**सहकार चळवळीचे तोटे :-** सहकार चळवळीपासून भारतीय अर्थव्यवस्थेस व विशेषत: ग्रामीण अर्थव्यवस्थेस नक्कीच फायदे मिळाले आहेत . तरी पण फायद्यांबरोबरच जेवढया प्रमाणात ही चळचळ यशस्वी व्हावयास हवी होती . तेवढी मात्र झालेली नाही . सहकार चळवळ असफल होण्याची काही कारणे पुढील प्रमाणे दाखविता येतील .

१) **अपुरा कर्जपुरवठा :-** सहकारी संस्थांद्वारे दिले जाणरे कर्जे अपु-या प्रमाणात आहे . १९७०-७१ मध्ये पंजाब,केरळ,गुजरात, तामिळनाडू व महाराष्ट्र राज्यात दर हेक्टरी ४० ते ५० रू पेक्षा अधिक कर्ज दिले गेले . आसाम, बिहार,मेघालय,ओरिसा,राजस्थान,प . बंगाल,मणिपूर,त्रिपुरा,नागालॅड येथे दर हेक्टरी २० रू पेक्षा कमी कर्ज दिले गेले . इतर राज्यात २० ते ४५ रू दर हेक्टरी कर्ज दिले . या आकडेवारीवरून हेच सिध्द होते की, शेतक-यांच्या गरजेच्या मानाने करण्यात आलेला कर्जपुरवठा अपुरा आहे .

२) **निष्क्रिय संस्था :-** जवळपास २५ टक्के संस्था निष्क्रिय आहेत . औद्योगीक सहकारी संस्थांमध्ये हेच प्रमाण ३३ टक्के इतके आहे . उत्तरप्रदेशात ४५००० संस्थापैकी ३०००० सहकारी संस्थाचा आकार अनार्थिक आहे . याचाच अर्थ असा की, संख्येच्या दृष्टीने सहकार चळवळीचा संख्यात्मक विकास झाला,परंतू गुणात्मक विकास झाला नाही .

३)**सरकारवर अवलंबून :-** ६५ वर्षाच्या करकीर्दीनंतर देखील या सहकारी संस्था प्रत्येक कार्या करिता सरकारवर अवलंबून आहेत . प्रशिक्षीत कर्म च्या-यापासून ते भांडवल उभारणीपर्यत सर्वच बाबतीत सरकारचे सहकार्य त्यांना आजही घ्यावे लागते . ही सहकार चळवळ नसून सरकार चळवळ आहे . असे यामूळेच मानले जाते .

४) **अकुशल व्यवस्थापन :-** प्रशिक्षीत कर्मचा-यांच्या अभावी सहकार चळवळीचे कार्य सुरळीत चालू शकत नाही . हिशोब व्यवस्थित नसणे,योग्य प्रकारे सभा न बोलवणे, कर्जवाटपात पक्षपात व उशीर इत्यादी कारणांमुळे व्यवस्थापनाचे अनेक प्रश्न निर्माण होतात . ही चळवळ लोकप्रिय न होण्याचे हे एक कारण आहे . संस्थेचे संचालक देखील व्यवस्थापणात कुशल नसतात .

५) **गरजूंना फायदा नाही :-**ज्यांच्यासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली आहे . त्यांनाच फायदा मिळत नाही ही या चळवळीची शोकांतिका आहे . या चळवळीमुळे काही प्रमाणात का होईना श्रीमंत लोक अधिक श्रीमंत झाले आहेत,तर गरीब लोक त्याच ठिकाणी राहिले आहेत .

६) **सुसूत्रीकरणाचा अभाव :-**आपण विविध प्रकारच्या सहकारी संस्था पाहिल्या आहेत . प्रत्येक संस्था सहकाराचे तत्व अमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहे . परंतु या विविध संस्थांच्या कार्यात सुसुत्रीकरणाचा हमखास अभाव आहे . ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अशा प्रकारचा समन्वय असणे अत्यंत आवश्यक असतो .

७) **नियमित परीक्षण व अंकेक्षणाचा अभाव :-** सभासद व सरकारच्या भांडवलाचा उपयोग कोणत्या पध्दतीने केला गेला आहे . त्यापासून किती फायदा झाला आहे . भाडवल वापरण्यातील दोष कोणते इत्यादी तपशील शोधून काढण्यासाठी प्रत्यक्षात संस्थेचे परीक्षण होत नाही आणि अंकेक्षणही होत नाही . त्यात भर म्हणजे कर्मचा-यांकडे कामाचे इतके ओझे असते की, अंकेक्षणलाही हवा तेवढा वेळ ते देऊ शकत नाहीत .

८) **योग्य नेतृत्वाचा अभाव :-** त्याग भावनेने कार्य करण-या कार्यकर्त्याची उणीव चळवळीस प्रथमपासूनच भासली आहे . ज्यांच्या हातात नेतृत्व आहो,त्यांना चळवळीविषयी आपुलकी व प्रेम नाही . आजही फार मोठया प्रमाणावर सावकार किंवा मध्यस्थच या चळवळीचे नेतृत्व करतात .

९) **अन्य कारणे :-** याशिवाय गरिबी, मोठया प्रमाणावरील कर्जबाजारीपणा, अशिक्षितपणा, व्यवसयिक अनुभव कमी,अनार्थिक धारण क्षेत्र, वहातुकीच्या, साठवणुकीच्या सोयींचा अभाव, नियमित बाजारांची अनुपस्थिती, शेती करण्याची जुनी पध्दती इत्यादी .

अशा प्रकारे सदरच्या लेखामध्ये जागतिक सहकार चळवळ कशी निर्माण झाली आहे . तसेच या जागतीक चळवळीचे फायदे काय आहेत व तोटे काय आहेत . याचा अभ्यास करण्यात आला आहे .

**संदर्भ :-**

१ . डॉ . वि . वि . घाणेकर : सहकार चळवळीचे १०० वषाचे अवलोकन व नवी आव्हाने,इन्स्टीटयूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट ॲन्ड एज्युकेशन,पुणे, प्रथम आवृती २००४
२ . Prof. D.A.Gudgil: Towords a co-operative common wealth, Edi. १९६१

३ .प्रा .जे .एम .साळवे - "शेती विकासामध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे योगदान" (विशेष अभ्यास पुणे जिल्हा २००१ ते २०१०) शोधनिबंध



जगन्नाथ मोतीराम साळवे
अर्थशास्त्र विभागप्रमुख, मु .सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर ता-बारामती जि-पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org